दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १५ वे • अंक १७३ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.१७ सप्टेंबर २०२० • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

कोप्रोली येथिल ग्लोबिकॉन गोदामात रक्तचंदनाचा साठा ; डीआरआयची कारवाई

दै.रायगड नगरी । जेएनपीटी

जेएनपीटी बंदरातून चोरट्या मार्गाने निर्यात करण्यासाठी आणलेले कोट्यावधी रूपयांचे रक्त चंदन डिआरआय (राजस्व आसूचना निदेशनालय) जप्त करण्यात आले असल्याचे विश्वसनिय सुत्रानी माहिती दिली. बुधवार दि१६ रोजी कोप्रोली येथिल ग्लोबिकॉन गोदामात ही कारवाई करण्यात आली आहे. विश्वसनिय सुत्रानी दिलेल्या माहितीनुसार संध्याकाळी उशिरापर्यंत डिआरआयची ही कारवाई सूरू होती. यामध्ये डीआरआयच्या अधिकाऱ्यांना एक रक्तचंदनाने भरलेला कंटेनर सापडल्याची माहिती आहे. त्यामुळे जेएनपीटी पुन्हा एकदा रक्तचंदन तस्करीचे केंद्र बिंदू ठरू पहात आहे.

उरण तालुक्यातील ग्लोबिकॉन गोदामात यापूर्वी जानेवारी २०१८ मध्ये एसीमध्ये लपवून १५ किलो सोन्याच्या लगडी आणल्याची तस्करी डीआरआयने पकडली होती ..../२

कोरोनाच्या नावाखाली पनवेलकरांची लूट आणि अधिकारी मालामाल

दै.रायगड नगरी । विशेष प्रतिनिधी

पनवेल : संपूर्ण जगात कोरोनाने सळो की पळो करून जनतेला सोडलेले आहे. त्यातून भारतासारखा प्रगत देश बनविणाऱ्या पंतप्रधानांचा देश म्हणून जो ओळखला जातो तो ही या महामारीतून सुटलेला नाही. कोरोनाचा फायदा घेऊन देशभरात अनेक अधिकाऱ्यांनी आपली उखळे पांढरी केलेली आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील अनेक अधिकाऱ्यांनी आपली उखळ पांढरी करण्याची आलेली संधी सोडलेली नाही. त्यामध्ये मोठमोठ्या महापालिका असाव्यात असा जनतेचा अंदाज आहे. परंतु पनवेल महापालिकेतील अधिकाऱ्यांनी आ-पले उखळ पांढरे करण्यासाठी एकही संधी सोडलेली दिसत नाही. त्यामुळेच कोरोनाच्या नावाखाली सदृश्य परिस्थितीच्या वेळी आवश्यक असणारे सामान प्राप्त करण्यासाठी लाखो रुपयांच्या खिरापती ठेकेदारांना दिल्याचा प्रथम दर्शनी अहवाल प्राप्त झाला आहे. त्यामुळे अधिकारी तुपाशी व कोरोनाग्रस्त उपाशी असे म्हटल्यास ते काही वावगे ठरणार नाही असा मतप्रवाह पनवेलमधील जनतेमधून व्यक्त केला जात आहे.

राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव वाढीस लागलेला असताना तो नियंत्रणात आणण्यासाठी महाविकास आघाडी सरकार प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत. आर्थिक परिस्थिती सरकारची घसरलेली असताना देखील कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे निष्पाप नागरिकांचे बळी जाऊ नयेत म्हणून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत आणि त्याला साथ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उपमुख्यमंत्री अजित पवार देत आहेत आणि राज्याचे ज्येष्ठ नेते आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार हे आपला योग्य सल्ला त्यांना देत आहेत आणि त्यामुळे कुठेही निधीची कमतरता पडत नाही असे असताना तो निधी योग्य ठिकाणी वापरावा अश्या सूचना शासनाने दिलेल्या असतानाही त्या पायदळी तुडवून केवळ स्वतःच्या आर्थिक लाभासाठी पनवेल महापालिकेचे अधिकारी खिरापत वाटतात याप्रमाणे कोरोना सदृश्य परिस्थितीच्या वेळी आवश्यक असणारे सामान प्राप्त करण्यासाठी ५ लाख २५ हजार रुपये एका कंपनीला तर ७ लाख ३९ हजार रुपये दुसऱ्या कंपनीला आगाऊ रक्कम देऊन टाकते आणि याला सत्ताधारी आणि विरोधक देखील विरोध करीत नसून ही पनवेलकरांची चाललेली लूट थांबविण्यासाठी पनवेलकरांना जागे करण्यासाठी दैनिक रायगड नगरीला हा खटाटोप करावा लागत आहे. याचा पनवेलकरांनी रस्त्यावर येऊन अथवा या भ्रष्टाचाराविरोधात लाचलुचपत खात्याकडे या भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांची सखोल चौकशीची मागणी करावी तरच यांच्या भ्रष्टाचाराला चाप बसेल अन्यथा पनवेलकरांची यापेक्षाही मोठी लुट होणार यात सुतराम शंका नाही.



अधिकारी तुपाशी आणि कोरोना रुग्ण उपाशी

(भाग ३) अवश्य वाचा, उद्याच्या अंकात

पत्रकारांच्या कुटुंबियांना ५० लाखांची मदत द्या ; १८ सप्टेंबर रोजी पत्रकार रस्त्यावर उतरणार

आरोग्य मंत्र्यांना हजारो एसएमएस पाठविणार

दै.रायगड नगरी । मुंबई

महाराष्ट्र सरकारने घोषणा केल्यानंतरही राज्यातील कोरोना बळी पत्रकारांच्या कुटुंबियांना ना पन्नास लाखांची मदत मिळाली ना पत्रकार विमा योजना सुरू केली गेली. त्यामुळे महाराष्ट्रातील पत्रकारांमध्ये मोठा असंतोष असून तो व्यक्त करण्यासाठी शुक्रवार दिनांक १८ सप्टेंबर रोजी राज्यातील पत्रकार आरोग्य मंत्र्यांना हजारो एसएमएस पाठवून आपला संताप व्यक्त करणार आहेत. मराठी पत्रकार परिषदेने या आंदोलनाची हाक दिली असून पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती आणि अन्य काही संघटना या आंदोलनात सहभागी होत असल्याची माहिती एस.एम.देशमुख यांनी एका पत्रकाव्दारे दिली आहे.

आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी बुलढाणा येथील एका कार्यक्रमात बोलताना कोरोना योद्धे असलेल्या पत्रकाराचं कोरोनानं निधन झालं तर त्याच्या कुटुंबियांना ५० लाखांची मदत देण्याची घोषणा केली होती. मात्र राज्यात आतापर्यंत २५ पत्रकारांचे बळी कोरोनानं घेतले असले तरी एकाही पत्रकाराच्या कुटुंबियांना पन्नास लाखांची काय दमडीची ही मदत सरकारकडून मिळाली नसल्याने पत्रकारांमध्ये मोठा संताप आहे. पुण्यातील पत्रकार परिषदेत बोलताना राजेश टोपे यांनी पुढील कॅबिनेटमध्ये पत्रकारांना विमा कवच देण्याबाबत निर्णय घेतला जाईल अशी घोषणा केली होती. मात्र त्याबाबतही कोणताच निर्णय सरकारने घेतला नसल्याने राज्यातील पत्रकार मोठ्या अडचणीत आहेत. कोविड सेंटरमध्ये योग्य सुविधा मिळत नाहीत आणि खासगी रूग्णालयातील महागडे उपचार परवडत नाहीत अशा कात्रीत पत्रकार सापडले आहेत.

राज्यातील काही पत्रकारांना योग्य उपचार मिळाले नसल्याने त्यांचे मृत्यू झाले आहेत. टीव्ही ९ चे पांडुरंग रायकर आणि माथेरानचे संतोष पवार ही त्याची उदाहरणे आहेत. रायकर यांच्या मृत्यूची चौकशी करण्याचे आदेश आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी दिले होते. मात्र घटना घडून पंधरा दिवस झाले तरी पांडुरंग रायकर यांच्या मृत्यूस जबाबदार कोण आहे? ते समोर आलेले नाही.. या सर्व घटनांमुळे पत्रकारांना सरकारने आणि मालकांनी वारयावर सोडल्याचे चित्र निर्माण झाले आहे.. परिणामत: पत्रकारांमध्ये मोठा असंतोष आहे. तो व्यक्त करण्यासाठी राज्याच्या कारभार्यांना एमएमएस पाठवून आपला व्यवस्थेबद्दल रोष व्यक्त केला जाईल. त्याच बरोबर राज्यातील प्रत्येक तालुका तहसिलदार कार्यालय आणि जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तोंडाला काळे मास्क लावून निदर्शने करण्यात येतील आणि तहसिलदार, जिल्हाधिकारी यांना निवेदनं देण्यात येतील.

कोरोनानं बळी गेलेल्या पत्रकारांच्या कुटुंबियांना पन्नास लाख रूपयांची मदत मिळावी, पत्रकार विमा योजना तातडीने लागू करावी, .../२

एस.एम एस पाठविण्यासाठी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांचा नंबर खालील प्रमाणे

राजेश टोपे ९६१९१११७७७

एसएमएसचा मजकूर

पत्रकार कोरोना यौध्दे आहेत ना? मग पत्रकारांची काळजी घ्या, कोरोनानं मृत्युमुखी पडलेल्या पत्रकारांच्या नातेवाईकांना ५० लाखांची मदत द्या, पत्रकारांसाठी विमा योजना लागू करा.

(मेसेज च्या खाली आपले संपूर्ण नाव, गावाचे नाव आणि आपण काम करीत असलेल्या वृत्तपत्राचे नाव लिहावे)

ट्विटर खाते असणाऱ्या पत्रकारांनी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि आरोग्य मंत्री राजेश टोपे आणि विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांना ट्विटरवर टॅग करावे.

राज्यात जम्बो पोलीस भरती ; साडेबारा हजार पदे भरणार

दै.रायगड नगरी । मुंबई

राज्यात जम्बो पोलीस भरती करण्यात येणार आहे. पोलीस दलातील एकूण साडेबारा हजार पदे भरण्यात येणार असून राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. राज्यातील पोलीस दलातील ही आजवरची सर्वात मोठी भरती असल्याचंही सांगण्यात येतं.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. त्यात हा निर्णय घेण्यात आला. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर स्वत: गृहमंत्री अनिल देशमुख यांनी मीडियाशी संवाद साधत ही माहिती दिली. राज्यात पोलीस दलातील साडेबारा हजार पदे भरण्यात येणार आहेत. पोलीस शिपाई संवर्गातील १०० टक्के पदे भरण्यात येणार आहेत, असं अनिल देशमुख यांनी सांगितलं. ही भरती प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करण्यात येणार आहे. त्याचा आराखडा तयार करण्यात येणार आहे. या भरतीमुळे ग्रामीण आणि शहरी भागातील तरुण-तरुणींना पोलीस दलात संधी मिळेल, असं सांगतानाच महाराष्ट्राच्या इतिहासातील पोलीस दलातील ही सर्वात मोठी भरती असल्याचा दावाही त्यांनी केला.

लॉकडाऊनच्या काळात पोलिसांवर कामाचा अतिरिक्त ताण वाढला होता. शिवाय अनेक पोलिसांना करोनाची लागण झाली होती. त्यात काही पोलिसांचा मृत्यूही झाला होता. त्यामुळे पोलिसांवरील हा ताण कमी करण्यासाठी पोलीस दलात नवी भरती करण्याचा निर्णय महाविकास आघाडीने घेतला आहे. या पूर्वी जुलै महिन्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत पो-लीस दलात दहा हजार पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यावेळी गृहविभागाकडून पोलीस शिपाई पदाच्या ८ हजार जागा भरण्याचा प्रस्ताव आला होता. त्यात उपमुख्यमंत्र्यांनी आणखी दोन हजार जागा वाढवल्या होत्या. आज झालेल्या मंत्रिंडळाच्या बैठकीत आणखी अडीच हजार जागांची भर घालून साडेबारा हजार पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला.

सिडको प्रशासनाचा जाहीर निषेध करण्यासाठी २१ सप्टेंबर रोजी मोर्चा

दै.रायगड नगरी । पनवेल

लोकनेते स्व.दि.बा.पाटील यांच्या लढ्यानंतर सिडकोवर प्रकल्पग्रस्तांचा मोर्चा काढण्यात आला नाही. सिडकोने गरजेपोटी वाढवलेली घरे नियमित केली नाही. साडेबारा टक्के भूखंड अद्याप आपल्या प्रकल्पग्रस्तांना मिळा-लेले नाही. गावांमधील जी मंदिर मस्जिद, बुद्धविहार आहेत यांना कायम केलेले अथवा मंजूरी दिलेली नाही. अतिक्रमण विभागाचे कर्मचारी येवून राहती घरे तोडत आहे. या सिडकोच्या कारभारा विरोधात २१ सप्टेंबर २०२० रोजी मोर्चा काढण्यात येणार असल्याचे पनवेल महापालिकेचे उपमहापौर व रिपाई कोकण प्रदेश अध्यक्ष, रायगड जिल्हा व नवी मुंबई निरीक्षक जगदीश गायकवाड यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

या निवेदनात पुढे म्हटले आहे की, इथे प्रकल्पग्रस्तांच्या अनेक संघटना आहेत. संघटनेमध्ये बौद्ध अनुयायाला, मुस्लीम बांधवाला, आदिवासी ठाकूर बांधवाला या संघटनेत घेतले जात नाही अथवा कराडी बांधवांचा देखील समावेश करून घेतला जात नाही. ठराविक पुढारी प्रकल्पग्रस्तांची संघटना निर्माण करतात आणि स्वतःसाठी भूखंड प्राप्त करून घेतात. त्यामुळे आपण केलेली आंदोलने चिरडली जातात. त्यामुळे सिडकोच्या विरोधात मोठे आंदोलन केल्याशिवाय पर्याय नाही. या रायगड जिल्ह्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अलिबाग येथील चरी येथे शेतकऱ्यांसाठी आंदोलन केले आणि शेतकऱ्यांना सातबारा मिळवून देण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले. रायगड जिल्ह्यामधील चिरनेर जंगल सत्याग्रह ही केस सुद्धा डॉ.बाबासाहेब आंबेडकरच जिंकले. शेतकऱ्यांचा लढा उभारण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सातत्याने या रायगड जिल्ह्यात येत असत. महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केला आहे. स्व.दि.बा.पाटील यांनी आपल्याला आंदोलने कशी करायची हे शिकवले आहे. दि.बा.पाटील साहेब यांच्यानंतर हा पहिला भव्य मोर्चा काढण्यासाठी महापालिका उपमहापौर जगदीश गायकवाड स्वतः सक्रीय सहभाग घेत आहे. त्यांच्यासमवेत विविध सामाजिक, राजकीय पुढारी या आंदोलनात सक्रीय सहभाग घेणार असल्याचे सांगितले.

वास्तुविहार आणि सेलिब्रेशन मधील २९ इमारती धोकादायक

पालिकेने नोटीस पाठविल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण

दै.रायगड नगरी । पनवेल

खारघर सेक्टर १६,१७ मधील वास्तुविहार आणि सेलिब्रेशन मधील २९ इमारती धोकादायक झाल्याचे निदर्शनास येत असून केव्हाही पडण्याचा संभव आहे. त्यामुळे जीवितास धोका निर्माण झाला आहे. सदर इमारती सुस्थितीत असले बाबत तीन दिवसात स्ट्रक्चर ऑडिट अहवाल पालिकेला सादर करावे अश्या प्रकारची नोटीस पालिकेने बाजवल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

खारघर सेक्टर -सोळा, सतरा मध्ये अल्प उत्पन्न तसेच नोकरी आणि व्यवसाय करणाऱ्या नागरिकांसाठी सिडकोने वास्तुविहार आणि सेलिब्रेशन या दोन गृहनिर्माण प्रकल्पात २१४४ घरे उपलब्ध करून दिले. आणि २०१० साली भाग्यवान सदनिकांना घरांचा ताबा दिला. या दोन्ही सोसायटी मध्ये नागरिक गुण्या गोविंदाने वास्तव्य करीत असताना पनवेल पालिका प्रसाशनाने सेक्टर १७ मधील केएच चार या सेलिब्रेशन सोसायटी मधील मधील १९ इमारती आणि सेक्टर १६ वास्तुविहार मधील के एच दोन मधील दहा इमारतीची पाहणी केली असता. जीवितास धोकेदायक असून असून सदर घराचा त्वरित वापर बंद करावा. सदर इमारतीचे स्ट्रक्चर ऑडिट करून दिवसात पालिकेकडे अहवाल सादर करावे अश्या प्रकारच्या नोटीस पालिकेच्या खारघर प्रभाग अधिकाऱ्याने पाठविल्यामुळे रहिवासीयांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या विषयी पालिकेच्या खारघर प्रभाग अधिकारी दशरथ भंडारी यांच्याशी संपर्क केला असता खारघर आणि तळोजा मधील धोकादायक इमारतींना नोटीस पाठविल्याचे सांगितले.

ठेवीदारांना संरक्षण

लोकसभा अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी बँकिंग नियमन दुरुस्ती विधेयक सादर केले आणि बँकिंगमधील नव्या महत्त्वाच्या टप्प्याला सुरुवात झाली. अर्थात, सदर विधेयक अपेक्षितच असले आणि असेच विधेयक मार्चमध्ये टाळेबंदीच्या आधी अर्थमंत्र्यांनी सादर केले असले तरी आता नवीन विधेयकाकडे ऐतिहासिक म्हणूनच पाहावे लागेल. कारण अजून सुधारणा पुरवणीसह सादर केले जाणारे विधेयक संमत झाल्यानंतरचे बँकिंग व्यवहार आणि बँक या संस्थेशी संबंधित सगळ्या व्यवहारांची आणि व्यवस्थांची पुनर्मांडणी आणि पुनर्व्याख्यांकन होणार आहे. काही महिन्यांपूर्वी केंद्र सरकारने रिझर्व्ह बँकेला दिलेल्या बँकांच्या पुनर्रचनेसाठीच्या विशेष अधिकारांच्या पलीकडे घेऊन जाणारे सदर विधेयक आहे. कारण याद्वारे रिझर्व्ह बँकेला जनहिताच्या कारणास्तव व्यापक पाऊल उचलणे सोपे जाईल, असा दावा अर्थमंत्र्यांनी केला आहे. म्हणजे त्यायोगे देशातील सर्व बँका आणि सहकारी बँका यांच्यामध्ये जो एक मोठा फरक आणि वेगवेगळी व्यवस्थापन पद्धती होती, ती कायमची बदलून जाणार आहे. त्याचबरोबर सहकारी बँका अडचणीत येण्याचे किंवा राजकीय शक्तीने त्यांना ठरवून अडचणीत आणण्याचे जे प्रकार होत होते, त्याचा पहिला बळी सर्वसामान्य माणूस असायचा आणि या गैरप्रकारांची किंमत तो घामाच्या बचतीने चुकवायचा. या पैशाचे रक्षण होण्यासाठी हे बदल उपयोगी ठरतील. तसेच, याआधीच्या सहकारी बँकांवर देखरेख करणाऱ्या अन्य प्रशासकीय व्यवस्थांचा प्रभाव कमी होईल आणि काही बाबतीत तो संपेलही. विशेष म्हणजे, आता सहकारी बँकांवरचे नियंत्रण आपल्या ताब्यात घेण्याचा रिझर्व्ह बँकेचा निर्णय स्वयंसिद्ध आणि अंतिम असेल. या निर्णयात सहभागी होणाऱ्या आणि निर्णायक अधिकार असलेल्या संचालक मंडळांचा अधिकारही आधीसारखा नसेल. खासकरून बहुराज्यीय सहकारी बँकांच्या संचालक मंडळाला असलेले अधिकार या नव्या विधेयकातून कायमचे कमी होणार असून रिझर्व्ह बँक संचालक मंडळाच्या निर्णयाला बाजूला करू शकेल. त्यासाठी, जनहित अर्थात ठेवीदारांचे हित या कारणास्तव रिझर्व्ह बँक पूर्ण बँकेचा ताबा घेऊ शकेल आणि याबाबत संचालक मंडळाच्या निर्णयाला महत्त्व उरणार नाही. या पार्श्वभूमीवर राज्य आणि केंद्र यांच्यातील व्यावहारिक संबंधावर प्रश्नचिन्ह उभे राहणे साहजिक आहे. कारण, केंद्रीय संस्थेकडे सगळे अधिकार एकवटले जातील. मात्र, आत्तापर्यंत सहकारी बँकांचे व्यवहार, सहकार खाते आणि रिझर्व्ह बँक या दोन्ही पातळीवर व्हायचे आणि अंतिम जबाबदारी कोणा एकाची नसल्याने त्यातून आतापर्यंत जे काही झाले ते वास्तव सर्वांना माहीत आहे. त्याच्यावर निर्णायक उपाय राज्य सहकारी खात्यालाही काढता आला नाही आणि रिझर्व्ह बँकेच्या अखत्यारीत सगळ्या गोष्टी नसल्याचे कारण सांगून हात वर करणे आजवर सोपे होते. या महत्त्वपूर्ण बँकिंग सुधारणांना काही काळापूर्वी अडचणीत आलेली पीएमसी बँक कारण ठरली. गेल्या सप्टेंबरमध्ये या बँकेच्या व्यवहारांवर म्हणजेच मुख्यत: ठेवीदारांच्या स्वत:च्या रकमेच्या वापरावर मर्यादा आल्या. आधीही अनेक सहकारी बँका अडचणीत आल्या, बुडाल्या आणि विस्मरणात गेल्या. त्यांचे हजारो, लाखो ठेवीदार वाऱ्यावर गेले आणि आणि अनेक वर्षे जाऊनही त्यांना न्याय मिळाला नाही. अगदी त्यांच्या विमा संरक्षण असणाऱ्या मर्यादित रकमेचाही त्यांना लाभ मिळाला नाही. परंतु पीएमसी बँकेबाबत थोडे वेगळे घडले. ही अधिक मोठी, अधिक कार्यक्षम आणि व्यापक तसेच प्रभावी व्यक्तींच्या संबंधातील बँक असल्याने त्यांनी जोरदार दबाव आणत ती चर्चेत ठेवली. ठेवीदारांनी गेले वर्षभर लढा चालू ठेवला. त्यातून या बँकेच्या ठेवीदारांना या नव्या सुधारित विधेयकाने आशेचा नवा किरण दाखवला आहे. अर्थमंत्री सीतारामन यांनी पहिल्या दिवशी आधीचा वटहुकूम मागे घेत या विधेयकात काही दुरुस्त्या अंतर्भूत करायचा असल्याने ते विधेयकही सुधारित आवृत्तीसाठी मागे घेतले. त्यातील व्यावहारिक गोंधळापेक्षाही त्यात अंतर्भूत होणाऱ्या तरतुदी मोलाच्या आहेत. पीएमसी बँकेच्या ठेवीदारांचे उदाहारण द्यायचे तर, या बँकेच्या ठेवीदारांना त्यांच्या व्यक्तिगत कोट्यवधींच्या ठेवी असूनही पहिल्यांदा एक हजार, नंतर दहा हजार व पुढे पन्नास हजार आणि आता दोन महिन्यांपूर्वी एक लाख रुपयांची रक्कम काढण्याची मुभा देण्यात आली. या नव्या तरतुदीमुळे असे निर्बंध आणण्याची आवश्यकता रिझर्व्ह बँकेला भासणार नाही, असा अर्थमंत्र्यांच्या दावा आहे. पीएमसी बँकेच्या ठेवीदारांना उपचारासाठीही स्वत:चे पैसे न मिळाल्याने अनेकांचा मृत्यू ओढावला, असा आरोप केला जातो. त्यावरून या तरतुदीचे मोल लक्षात यावे. ज्या संस्थांच्या शीर्षकामध्ये 'बँक, बँकर, बँकिंग' या शब्दांचा वापर नाही त्यांन हे विधेयक लागू नसेल. त्यामुळे प्राथमिक स्वरूपाच्या, तसेच कृषी पतपुरवठा व अन्य सहकारी पतसंस्थांना या विधेयकाची व्याप्ती सामावून घेणार नाही. हाच आधार घेऊन कदाचित राज्य सरकारचे अधिकार संपत नसल्याचा दावा अर्थमंत्र्यांनी केला असेल. परंतु तसे नाही. यातून सहकारी बँक ही शीर्षकात बँक या शब्दाचा वापर करीत असल्याने त्याला अन्य बँकांच्या बरोबरीने वागवण्यात येईल. बँकिंग व्यवहारातील सर्व संस्थांचा अंतिमत: अखेरचा शब्द रिझर्व्ह बँक असेल. याबाबत कितीही वादविवाद झाला तरी एक गोष्ट स्पष्ट आहे, की आजवर सहकारी बँकांचा जो गैरवापर राजकीय शक्तींनी केला आणि ज्या प्रमाणात ठेवीदारांना देशोधडीला लावले, त्या पार्श्वभूमीवर हा बदल होत असल्यामुळे तो स्वागतार्ह आहे.

सेवासप्ताह निमित्त स्वच्छता मोहीम, जनजागृती पथनाट्य व वृक्षारोपण

दै.रायगड नगरी । पनवेल

जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेता व गरीब, वंचित, दलित, आदिवासी आणि शेतकऱ्यांसाठी देवदूत प्रमाणे काम करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस १७ सप्टेंबर रोजी आहे. दरवर्षी पक्षाचे सर्व कार्यकर्ते सेवा सप्ताहाच्या दरम्यान विविध प्रकारचे सेवाकार्य करतात. त्या अनुषंगाने भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग १७, १९ आणि २० मध्ये स्वच्छता मोहीम, जनजागृती पथनाट्य तसेच वृक्षारोपण कार्यक्रम आज (दि. १६) संपन्न झाले.

सामाजिक अंतराचे नियम पालन पाळून पनवेल महापालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर व भाजपचे शहर मंडल अध्यक्ष जयंत पगडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमास सरचिटणीस व नगरसेवक नितीन पाटील, माजी नगराध्यक्ष संदिप पाटील, नगरसेवक प्रकाश बिनेदार, नगरसेवक मनोज भुजबळ, माजी उपमहापौर व नगरसेविका चारुशीला घरत, नगरसेवक अजय बहिरा, नगरसेवक तेजस कांडपिळे, नगरसेविका रूचिता लोंढे, नगरसेविका सुशिला घरत, माजी नगरसेवक जगदिश गायकर, जगदिश घरत, रघुनाथ बहिरा, प्रभाग अध्यक्ष पवन सोनी, शहर सरचिटणीस अमरीश मोकल, संजय जैन, चिटणीस सुनिल खळदे, हारुशेठ भगत, चंद्रकांत मंजुळे, दत्ता पाटील, यतीन देशमुख, राजू कोळी, सागर बहिरा, नैनेश वाघिलकर, वसंत पगडे, संतोष अपसिंगेकर, जितेंद्र खुटकर, अफताब ताडे, हरून शेख, किरण बहिरा, गौरी पवार, मनिषा चिले, आदी उपस्थित होते.

सेवा सप्ताहानिमित्त प्रभाग १७ मध्ये स्वच्छता मोहीम तसेच प्लॅस्टिक मुक्ती जनजागृती पथनाट्य, प्रभाग १९ मध्ये मार्केट यार्ड परिसरात स्वच्छता मोहीम, छत्रपती शिवाजी महाराज चौकात प्लॅस्टिक मुक्ती जनजागृती पथनाट्य, प्रभाग २० मध्ये स्वच्छता मोहीम व वृक्षारोपण करण्यात आले.

स्वच्छता अभियान राबून पंतप्रधानांना वाढदिवसाच्या शुभेच्छा

दै.रायगड नगरी । पनवेल

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्षाकडून सेवा सप्ताह राबवला जाणार आहे. याअंतर्गत बुधवारी खांदा वसाहतीत पक्षाच्यावतीने स्वच्छता अभियान घेऊन पंतप्रधानांना शुभेच्छा देण्यात आल्या. मोकळ्या भूखंडावर जेसीबी आणि डंपर च्या माध्यमातून साफसफाई करण्यात आली. त्यामुळे परिसर स्वच्छ झालेला आहे.

नरेंद्र मोदी यांनी ६ वर्षांपूर्वी पंतप्रधान पदाची सूत्रे हाती घेतली. त्यांनी सर्वात अगोदर सार्वजनिक स्वच्छतेवर भर दिला. 'स्वच्छ भारत अभियान' राबून देशाचेच नाही तर संपूर्ण जगाचे लक्ष वेधले. आजही दुसऱ्यांदा पंतप्रधान म्हणून काम करीत असताना नरेंद्र मोदी यांनी स्वच्छतेचा ध्यास आणि कास सोडलेली नाही. गेल्या सहा वर्षात हे अभियान प्रभावीपणे राबविल्याने त्याचा सकारात्मक परिणाम देशात दिसून आला. त्यामुळे संपूर्ण देशाबरोबरच राज्य स्वच्छ ठेवण्यात मदत झालेले आहे. हे अभियान एक प्रकारे लोकचळवळ झालेले आहे. परिणामी आरोग्याच्या दृष्टिकोनातून खूप मोठा फायदा झाल्याचे दिसून आले आहे. दरम्यान पंतप्रधानांच्या वाढदिवसानिमित्त यावर्षी सेवा सप्ताह आयोजित करण्यात आलेला आहे. पनवेल तालुक्यातही आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली हा सप्ताह प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून खांदा वसाहतीत बुधवारी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. प्रभाग समिती सभापती संजय भोपी, पक्षाचे खांदा कॉलनी अध्यक्ष नगरसेवक एकनाथ गायकवाड, ज्येष्ठ नगरसेविका सिताताई सदानंद पाटील यांनी भाजपचा झेंडा दाखवून या अभियानाला सुरुवात केली. टी आय पी एल कंपनीच्या माध्यमातून डंपर आणि जेसीबी पुरविण्यात आले होते. सकाळी सुरू झालेल्या या अभियानात मोकळा भूखंडावरील डेब्रिज, पडलेल्या झाडांच्या फांद्या, झाडांचे खोड, पालापाचोळा त्याचबरोबर कचरा उचलण्यात आला. यावेळी रामनाथ पाटील , शांताराम महाडिक, गोपीनाथ मुंडे, प्रकाश खानावकर, चेतन जाधव, नवनाथ मेंगडे, सचिन गायकवाड, संजय कांबळे, प्रवीण भोसले जामले उपस्थित होते.

भाजयुमो पश्चिम महाराष्ट्र दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

दै.रायगड नगरी । पनवेल

पश्चिम महाराष्ट्र दौरा दरम्यान भाजयुमो पश्चिम महाराष्ट्र विभागाची विशेष बैठक महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष विक्रांत बाळासाहेब पाटील यांनी आयोजित केली होती. या मध्ये भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत दादा पाटील यांची विशेष उपस्थिती लाभली.

या प्रसंगी पश्चिम महाराष्ट्र विभाग भाजयुमो ची आगामी वाटचाल याविषयी चर्चा करण्यात आली. सेवा सप्ताह कार्यक्रम, आत्मनिर्भर भारत अभियान या विषयावर नियोजन करण्यात आले. या बैठकीला भाजपा पुणे शहर जिल्हा सरचिटणीस राजेश पांडे, भाजयुमो प्रदेश सरचिटणीस सुशिल मेंगडे, भाजपा पश्चिम महाराष्ट्र संघटन मंत्री रवी अनासपुरे, भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष अनुप मोरे, भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र साबळे, भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष सुदर्शन पाटसकर, प्रदेश सचिव प्रवीण पोंडे, सचिव प्रदीप गावडे, युवती विभाग सह संयोजिका वैशाली खाडे व इतर मान्यवर उपस्थित होते.

जेएसडब्लूची जलवाहिच्या दुरूस्तीसाठी पाणीपुरवठा तीन दिवसांपासून बंद

दै.रायगड नगरी । वाकण

डोलवी (ता.पेण) येथील जेएसडब्लू कंपनीच्या अनेक ठिकाणी फुटलेल्या जलवाहिनीची दुरूस्ती सोमवारी (दि१४) सकाळी सुरु करण्यात आली. मात्र या जलवाहिनीच्या दुरूस्तीसाठी जलवाहिनीचा पाणीपुरवठा तीन दिवसांपूर्वी सोमवार पासुनच बंद करण्यात आल्याने या जलवाहिनीवर अवलंबून असलेल्या नागोठण्यासह सुमारे ४२ गावांतील नागरिकांना विशेष करुन महिलांना पाणी तीव्र टंचाईला सामोरे जावे लागले. त्यातच जलवाहिनीच्या दुरूस्तीमुळे पाणीपुरवठा बंद ठेवणार असल्याची नागरिकांना कल्पना नसल्याने त्यांच्याकडून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला.

नागोठण्यातील के.टी. बंधा-यातून डोलवी येथील जेएसडब्ल्यु कंपनीत ही जलवाहिनी नेण्यात आली आहे. नागोठणे ते डोलवी पर्यंतच्या सुमारे ४२ गावांसाठी ही जलवाहिनी सुरु ठेवण्यात आली आहे. महामार्ग रुंदीकरणाचे काम सुरु असल्याने ही जलवाहिनी कुठे ना कुठे वारंवार फुटल्याच्या घटना यापूर्वीही घडल्या आहेत. असे असतांनाच काही महिन्यांपुर्वी ही जलवाहिनी महामार्गावर असलेल्या निगडे गावातील नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणात फुटली होती. मात्र त्यावेळी पाणीपुरवठा बंद होऊन नागरिकांची गैरसोयीचे होऊ नये यासाठी या जलवाहिनीचे काम थोड्याफार प्रमाणात करुन जलवाहिनीचा पाणीपुरवठा तत्काळ सुरु करण्यात आला होता. आता पुन्हा निगडेसह नागोठण्यातील इंद्रप्रस्थ हॉटेल समोर व चिकणी गावाच्या हद्दितील हॉटेल मयूर समोर ही जलवाहिनी मोठ्या प्रमाणात फुटल्याने तिच्या दुरूस्तीसाठी पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे. जलवाहिनी दुरुस्तीच्या कामासाठी नागोठणे ग्रामपंचायतीचे प्लंबरही सहकार्यासाठी पाठविण्यात आल्याचे सरपंच डॉ. मिलिंद धात्रक यांनी सांगितले. दरम्यान जेएसडब्ल्यु जलवाहिनीचा पाणीपुरवठा गुरूवारी (दि.१७) पूर्ववत होईल असेही मुरली नायर यांनी स्पष्ट केले आहे.

पाहिजेत

खोपोली इमॉजिकाजवळ एका वॉटर पॅकेजिंग कंपनीमध्ये मायक्रोबायोलॉजिस्ट (M.sc/B.sc) ची आवश्यकता आहे. तरी वरील पदासाठी किंवा तत्सम अनुभव असणाऱ्या इच्छुकांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

(जेवणाची/राहण्याची सोय केली जाईल याची नोंद घ्यावी.)

संपर्क : 9892233614 / 7498280800

कामगाराच्या न्याय हक्कासाठी मनसे द्रोणागिरीत धडकली

दै.रायगड नगरी । जीवन केणी

उरण : कोरोनाच्या काळात जेएनपीटी परिसरातील गोडाऊन मधील सर्व्हे, लोकल लेबर, गार्ड यांना कामावरून काढणे, पगार कपात करून कामगारांनवर अन्याय होत असताना महाराष्ट्र वखार महामंडळातील कामगारांनी न्याय मिळण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेचे सभासद स्विकारले आहे.

त्यांच्यावर झालेल्या अन्याला वाचा फोडण्यासाठी कामगार सेनेचे संयुक्त सरचिटणीस सचिन गोळे, सावंत, जिल्हाध्यक्ष अतुल भगत, यतीन देशमुख, तालुका उपाध्यक्ष सत्यवान भगत, अमोल बोचरे, दिपक पाटील आणि कामगार प्रतिनिधी यांनी वखार महामंडळाचे अध्यक्ष कृष्णा लॉजिस्टिकचे व्यवस्थाक यांना धारेवर घेऊन येत्या दहा दिवसांत कामगाराच्या मागण्या आणि चार महिन्याचे पगार दिला नसून तो त्वरित देण्यात यावा.

अन्यथा कामगारांच्या जिवाशी खेळत असाल तर मात्र मनसेच्या पद्धतीने समजावे लागेल असे व्यवस्थापनाला ठणकवण्यात आले .उरणमध्ये कामगार वर्गांच्या अनेक समस्या आहेत.

मनसेमुळे ते समस्या आता सुटण्यास मदत होईल. कामगारांना न्याय मनसेचं मिळवून देईल असा आत्मविश्वास कामगार वर्गांमध्ये निर्माण होत असून टप्प्या टप्प्याने अनेक कामगार वर्ग मनसेचे सदस्यत्व स्विकारत आहेत.

घरफोडी व चोरीचे गुन्हे करणाऱ्या आरोपींना अलिबाग पोलिसांनी केले जेरबंद

दै.रायगड नगरी । अलिबाग

अलिबाग पोलीस ठाण्याचे हद्दीतील घरफोडी व चोरी या दाखल गुन्ह्यातील आरोपीत याचा शोध घेऊन गुन्ह्यांची लवकरात लवकर उकल करण्याबाबत अनिल पारस्कर ,पोलीस अधीक्षक रायगड अलिबाग यांनी आदेशीत केले होते. त्यानुसार अलिबाग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक के.डी.कोल्हे यांना त्यांचे गुप्त बातमीदारांद्वारे घरफोडी चोरीच्या गुन्ह्यातील आरोपींबाबत खात्रीशीर माहिती मिळाल्यानेसदर माहिती अलिबाग विभागाच्या उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती सोनाली कदम सो. यांना कळवून, पोलीस ठाण्यातील एक पथक तयार करून अमोल रामचंद्र तुनतुने वय-२४ वर्ष रा.सहाणगोटी ता.अलिबाग, शिव सुभाष माळी वय-३० सध्या रा.ढवर ता.अलिबाग मूळ रा.मालीपुर खडवा ता.बेलथडा रोड जि.बलीया राज्य-उत्तरप्रदेश यांना ताब्यात घेऊन त्यांचेकडे गुन्ह्याचे अनुषंगाने चौकशी केली असता त्यांचा गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना अलिबाग पोलीस ठाणे कॉ.गु.रजि.नंबर ३९/२०२० भा.द.वि. ४५७,३८०,३४ प्रमाणे या गुन्ह्यात अटक करून त्यांचेकडे गुन्ह्याचे अनुषंगाने तपास केला असता सदर आरोपीत यांनी वरील गुन्ह्यात घरफोडी चोरी करून चोरून नेलेल्या एकूण १,४०,०००/- रुपये किमतीच्या एल.ई.डी.लाईट हस्तगत केल्या असून त्या जप्त करण्यात आलेल्या आहे.

तसेच वरील गुन्ह्यातील पोलीस कोठडीतील आरोपित अमोल रामचंद्र तुनतुने वय-२४ रा.सहाणगोटी ता.अलिबाग याचेकडे कौशल्यपूर्वक तपास करून त्याने सन २०१५ मध्ये चोरलेल्या एक बजाज पल्सर, एक होन्डा युनिकॉन, व दोन होन्डा ॲकटीवा अशा मोटार सायकली त्याने स्वता: चोरी केल्याची माहिती दिल्याने सदर वाहने त्याचेकडून हस्तगत करून जप्त करण्यात आलेली आहेत. सदरची कारवाई वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक के.डी.कोल्हे, सपोनि/कुंदन गावडे, सफौ/सानप, पोह हंबीर , पोना जाधव, निगडे, पोशि म्हात्रे, चालक पोह सावंत या पथकाने पार पाडली असून आरोपींकडून एकूण १,२०,०००/- रुपये किमतीच्या मोटार सायकली जप्त करून वरील गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. आरोपित यांना मा.न्यायालयाने दिनांक १८/०९/२०२० रोजीपर्यंत पोलीस कस्टडी रिमांड दिलेली असून गुन्ह्याचा पुढील तपास के.डी.कोल्हे पोलीस निरीक्षक अलिबाग पोलीस ठाणे हे करीत आहेत.

पृष्ठ क्र.१ वरुन...

गोदामात रक्तचंदनाचा साठा ; डीआरआयची कारवाई

आत्ता पुन्हा एकदा याच गोदामात रक्तचंदनाचा साठा सापडल्याने हे गोदाम म्हणजे तस्करांचा अड्डा तर नाही ना अशी शंका व्यक्त करण्यात येत आहे. आज डिआरआयने केलेली कारवाई ही अत्यंत गुप्त ठेवण्यात आली होती. कंपनीमध्ये असलेल्या कामगारांना बाहेर येवू दिले जात नव्हते तर बाहेरच्या कामगारांना आतमध्ये सोडले जात नव्हते. स्थानिक पोलिसांना देखिल कारवाई पासून दुरू ठेवण्यात आले होते. या बाबत कंपनीतल्या सुत्रांनी कंपनीत एका कंटेनरमध्ये रक्तचंदनाचा साठा सापडला असल्याचे सांगितले. याबाबत डीआरआयच्या न्हावाशेवा रिजनल यनिट कार्यालयामध्ये माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता मुंबई झोनल युनिट कडून ही कारवाई करण्यात आली असल्याची माहिती दिली. ग्लोबिकॉन कंटेनर यार्डचे जी एम लक्ष्य तडाडीकर यांना रक्तचंदनाच्या कारवाई संदर्भात विचारणा करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी बोलण्यास नकार दर्शविला आहे.

पत्रकारांच्या कुटुंबियांना ५० लाखांची मदत द्या

पत्रकारांसाठी प्रत्येक रूग्णालयात ऑक्सीजन, व्हेंटीलेटरसह त्वरीत बेड उपलब्ध करावा आणि पांडुरंग रायकर आणि संतोष पवार यांच्या मृत्यूची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या चौकशी समितीचे अहवाल जाहीर करून जबाबदारांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करावेत अशा मागण्या निवेदनात करण्यात येणार आहेत. एकीकडे कोरोना यौध्दे म्हणून माध्यमांना गोंजरायचे आणि दुसरीकडे त्यांना वार्यावर सोडायचे असे केंद्र आणि राज्य सरकारचं धोरण आहे.. या धोरणाच्या विरोधात आणि पत्रकारांच्या हक्कासाठी आरोग्य मंत्र्यांना जास्तीत जास्त एसएमएस पाठवून पत्रकारांनी मोठ्या संख्येनं आंदोलनात सहभागी व्हावं असं आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख, विश्वस्त किरण नाईक, अध्यक्ष गजानन नाईक, कार्याध्यक्ष शरद पाबळे, सरचिटणीस संजीव जोशी, कोषाध्यक्ष विजय जोशी, राज्य सोशल मिडिया प्रमुख बापुसाहेब गोरे, राज्य महिला संघटक जान्हवी पाटील, राज्य प्रसिध्दी प्रमुख अनिल महाजन, आदिंनी केले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

सुधागडातील निसर्गचक्री वादळग्रस्त नुकसान भरपाईपासून वंचित ; नाडसुर ग्रामस्थांचे पाली तहसीलदारांना निवेदन

... अन्यथा प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडणार असल्याचा इशारा

दै.रायगड नगरी । पाली/बेणसे

३ जून रोजी झालेल्या निसर्ग चक्री वादळाचा फटका सुधागडसह जिल्ह्याला मोठ्या प्रमाणात बसला. या वादळाने घरे, गोठे, फळबागा, शेती, दुकानांचे कोट्यावधींचे नुकसान झाले. वादळाला तीन महिने उलटून गेले तरी अद्याप सुधागड तालुक्यातील वादळग्रस्त हे शासन नुकसान भरपाई च्या प्रतीक्षेत आहेत. शिवाय पंचनाम्याच्या अनुषंगाने मिळालेल्या नुकसानभरपाईत देखील मोठी तफावत असल्याची तक्रार नाडसुर ग्रामस्थांनी पाली सुधागड तहसीलदार दिलीप रायन्नावार यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

ग्रामस्थांच्या मागणीला प्रेस संपादक व पत्रकार संघ खालापूर यांनी देखील पाठिंबा दर्शविला आहे. दरम्यान एकही वादळग्रस्त शासन नुकसान भरपाईपासून वंचित राहणार नाही, कुणावरही अन्याय होणार नाही, यासाठी प्रशासन पुरेपूर दक्षता घेत योग्य रीतीने काम करीत असल्याचे पाली सुधागड तहसीलदार यांनी बुधवारी दि. (१६) पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले. राज्य सरकारने वादळग्रस्त, बागायतदार, मच्छीमार यांना नुकसानभरपाई मिळणे कामी कोट्यवधींचा निधी जिल्हा प्रशासनाकडे वर्ग केला असताना नुकसान भरपाई योग्यरीत्या का मिळत नाही? असा संतप्त सवाल वादळ ग्रस्तांनी उपस्थित केला आहे. झालेल्या नुकसानीची योग्य ती नुकसान भरपाई कधी मिळेल? याची वादळग्रस्त चातकाप्रमाणे वाट पाहत आहेत. नुकसान भरपाई देण्याचा वेग देखील मंदावला आहे. नुकसानग्रस्तांना लवकरात लवकर नुकसान भरपाई न मिळाल्यास तीव्र आंदोलन छेडणार असल्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. निसर्गचक्री वादळाचा मोठा तडाखा नाडसुर ग्रामपंचायत हद्दीतील अनेक गावांना बसला आहे.

नुकसानीचे पंचनामे देखील तातडीने करण्यात आले. मात्र शासनाच्या अधिकाऱ्यांनी चुकीचे पंचनामे केल्याचा आरोप करीत ज्यांचे कमी नुकसान त्यांना अधिक नुकसान भरपाई तर ज्यां नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले त्यांना कमी नुकसानभरपाई मिळाली असल्याचे ग्रामस्तानी म्हटले आहे. नुकसानग्रस्त नुकसान भरपाईपासून वंचित राहिले असून त्यांच्यावर झालेल्या अन्यायाविरुद्ध आम्ही आवाज उठवू असे निवेदनकर्त्यांनी म्हटले आहे. शासनाने पंचनामे कोणत्या निकषांच्या आधारे केले असा प्रश्न निर्माण झाला असून चुकीच्या पद्धतीने पंचनामे करणाऱ्यांवर वरिष्ठ स्थरावर चौकशी व्हावी व दोषींवर कडक कारवाई करावी अशी मागणी नाडसुर ग्रामस्त व पत्रकार संघाने केली आहे. नुकसानग्रस्तांना योग्य ती भरपाई न मिळाल्यास आंदोलन छेडणार असल्याचा इशाराही निवेदनात दिला आहे.

> सुधागड तालुक्यातील ९९ टक्के च्या आसपास वादळग्रस्तांना नुकसान भरपाई मिळालेली आहे. अशातच नुकसानग्रस्तांच्या तक्रारीच्या अनुषंगाने तातडीने बैठक बोलावून योग्य ती कार्यवाही करण्यात आली आहे. सुधागड तालुक्यातील एकही वादळग्रस्त, बागायतदार शासनाच्या मदतीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेऊन प्रशासन काम करीत आहे.
>
> **दिलीप रायन्नावार,**
> **तहसीलदार पाली सुधागड**

९५ वर्षीय आई आणि त्याच्या विकलांग मुलीचे म्हसळा पोलिसांनी स्वीकारले पालकत्व

दै.रायगड नगरी । म्हसळा

संपूर्ण जगामध्ये कोरोना सारख्या महामारीने थैमान घातले असल्यामुळे मार्च महिन्यापासून ते आजतागायत प्रशासकीय कर्मचारी हे या संकटावर मात करण्यासाठी दिवस रात्र मेहनत करून आपले कर्तव्य बजावत आहेत. त्यामध्ये राज्य पोलीस दल यांच्यावर तर फार मोठी जबाबदारी असून पोलीस कर्मचारी यांना आपल्या कुटुंबाकडे सुद्धा लक्ष देण्यासाठी वेळ मिळत नाही. त्यातूनच म्हसळा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक धनंजय पोरे, कर्मचारी शाम कराडे, समर्थ सांगळे, संतोष चव्हाण, सूर्यकांत जाधव, विजय फोफसे हे कोरोना काळामध्ये तालुक्यात पेट्रोलीग करीत असताना तालुक्यातील सामान्य जनतेच्या समस्या जाणून घेऊन ते सोडवण्याचा उत्तम प्रकारे प्रयत्न करीत होते.

लॉकडाऊन कालावधी मध्ये अजून एक रायगड जिल्ह्यावर निसर्ग चक्रीवादळाच्या संकटाने हल्ला केला त्यामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले. गोर गरीब जनतेचे ह्यामध्ये फार मोठे नुकसान झाले.संपूर्ण म्हसळा तालुक्यातील गरीब व गरजू जनतेला रायगड पोलीस दलाकडून आलेल्या अत्यावश्यक वस्तू, धान्य, घरांचे पत्रे, ताडपत्री यांचे एक ना अनेक वेळा म्हसळा पोलीस स्टेशन यांच्याकडून वाटप करण्यात आले. म्हसळा तालुक्यातील देवघर बौद्धवाडी येथील निराधार ९५ वर्षीय महिला हिराबाई साळवी व त्यांची पूर्णतः अपंग व मूकबधिर असलेली ४९ वर्षीय मुलगी अल्का साळवी या दोघींचे पालन पोषण करण्यासाठी कोणीही नाही अशा कुटुंबाची म्हसळा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक पोरे साहेब यांना माहिती मिळाली. त्यावेळी पोरे साहेब यांनी कोणताही वेळ वाया न लावता थेट या कुटुंबाकडे धाव घेतली व या कुटुंबाला भेट देऊन त्याची विचारपूस व परिस्थितीची जाणीव करून घेऊन त्या कुटुंबाची सर्वस्व पालक तत्वाची जबाबदारी घेऊन त्यांना जाणवणाऱ्या समस्याचे निराकरण करीत आहेत. निसर्ग चक्रीवादळात या माय लेकीचे संपूर्ण घरदार उध्वस्त झाले जवळपास असणारे संपूर्ण धान्य पावसात भिजून खराब झाले. म्हसळा पोलिसांनी या मायलेकीचे संरक्षण करण्याकरिता सर्वप्रथम पत्रे व ताडपत्री यांची व्यवस्था करून दिली. संसारासाठी उपयुक्त असणारे सर्व अन्नधान्य उपलब्ध करून दिले.

तालुका मंडल भाजपच्यावतीने सेवासप्ताहानिमित्त मोफत नेत्रतपासणी व चष्मेवाटप शिबिर

दै.रायगड नगरी । पनवेल

देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त पनवेल तालुका मंडल भाजपच्यावतीने सेवासप्ताहानिमित्त आज(दि. १६) मोफत नेत्रतपासणी व चष्मेवाटप शिबिर पार पडले. याशिबिरात ७५ जणांना चष्मे वाटप करण्यात आले.

कोरोना संबंधित सर्व नियमांचे पालन करून तालुका मंडल अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, राज पाटील, युवा मोर्चाचे तालुका मंडल अध्यक्ष आनंद ढवळे, संतोष पाटील, अशोक पाटील आदी उपस्थित होते.

कोरोना महासाथीचा मुकाबला करताना 'संगठन ही सेवा' या उपक्रमांतर्गत विविध सेवाकार्य पक्षाचे कार्यकर्ते राज्यभर करत आहेत. त्या अनुषंगाने राष्ट्रीय अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा यांच्या सूचनेनुसार भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली उत्तर रायगड जिल्हा, पनवेल तालुका व शहर भारतीय जनता पार्टीच्या वतीने सेवा सप्ताह, पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती व राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीनिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम आयोजित केले जात आहेत. त्या अंतर्गत सेवासप्ताह निमित्त पनवेल तालुका मंडल भाजपच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात नेत्ररुग्णांची तपासणी करून ७५ जणांना चष्मा वाटप करण्यात आले.

पनवेल पालिका कर्मचाऱ्याचा कोरोनामुळे दुर्दैवी मृत्यू

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल उपजिल्हा रुग्णालयात शिपाई पदावर कार्यरत असणारे सुरेश गुरव यांचा कोरोनाचा उपचार घेत असताना दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडल्याने पनवेलकरांनी हळहळ व्यक्त केली आहे.

पनवेल उपजिल्हा रुग्णालयात काम करणारे सुरेश गुरव यांना कोरोनाचे निदान झाल्यामुळे त्यांच्यावर मुंबई येथील एका रुग्णालयात उपचार सुरू होते. परंतु तेथे त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. त्याचप्रमाणे पालिकेत कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या एका महिला कर्मचाऱ्याचा सुद्धा कोरोनामुळे दुर्दैवी मृत्यू झाल्याचे समजते. पनवेल महानगरपालिकेतील कर्मचारी व अधिकाऱ्यांना सुद्धा मोठ्या प्रमाणात कोरोनाची लागण झाल्याचे समजून येत आहे.



रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रीयल टाऊनचे सेवाभावी कार्य

दै.रायगड नगरी । पनवेल

रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाउन गेले ३० हून अधिक वर्षे अव्याहतपणे आपले समाजिक कार्य नित्यनेमाने करत आहे. पर्यावरण संरक्षणापासून समुदाय व आर्थिक विकासापर्यंत, जलसंधारण व स्वच्छतेपासून मूलभूत शिक्षण व साक्षरते पर्यंत, रोग प्रतिबंध व उपचारांपासून माता व बाल आरोग्य पर्यंत, समाज उन्नतीकरिता सर्वच क्षेत्रात रोटरी क्लबचे भरीव योगदान आजतागायत राहिले आहे.

सद्य परिस्थितीतील अनेक अडथळे व मर्यादा पार करत या रोटरी कालबने सामाजिक बांधिलकी न विसरता आपला सामाजिक कार्याचा नंदादीप अखंड तेवत ठेवला आहे. कोविड-१९ चे वैश्विक संकट, निसर्ग चक्रीवादळाची नैसर्गिक आपत्ती व त्यामुळे रायगड जिल्ह्याचे झालेले अतोनात नुकसान, या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत क्लबने ने गेल्या दोन महिन्यात तब्बल १७ सामाजिक उपक्रम राबविले आहेत. यात पर्यावरण संरक्षण अंतर्गत १, समुदाय व आर्थिक विकास अंतर्गत ८, जलसंधारण व स्वच्छता अंतर्गत १, मूलभूत शिक्षण व साक्षरता अंतर्गत ३, रोग प्रतिबंध व उपचार अंतर्गत ४ उपक्रमांचा समावेश आहे. पर्यावरण संरक्षण अंतर्गत गाढेश्वर धरण नजीकच्या वनसंरक्षण खात्याने प्रदान केलेल्या साडेबारा एकर जमिनीवर रोटरी फॉरेस्ट निर्माण करण्याच्या अतिशय महत्त्वाकांक्षी उपक्रमाची मुहूर्तमेढ याच काळात रोवली गेली. गेल्या दोन महिन्यात या ठिकाणी ३२५ हून अधिक प्रौढ वृक्षांची लागवड करण्यात आलेली आहे. मूलभूत शिक्षण व साक्षरता अंतर्गत ऑनलाइन झूम मिटिंगच्या माध्यमाने, मुलांची मानसिकता ओळखून शिक्षणाला अधिकाधिक मनोरंजक कसे बनवावे या विषयावर शिक्षकांसाठी ट्रेनिंग आयोजित केले गेले, तसेच या बदलत्या युगात शिक्षकांना डिजिटल माध्यमांची ओळख व प्रशिक्षण मिळवून देणारा डिजिटल गुरुमंत्र या उपयोगी अश्या उपक्रमात रोटरीने सहभागी झाले. डिजिटल गुरुमंत्र या प्रशिक्षण उपक्रमात राज्यभरातून तब्बल ३६००० शिक्षक सहभागी झाले. समुदाय व आर्थिक विकास अंतर्गत प्रोजेक्ट पंचम तसेच ऑनलाइन मीटिंग च्या माध्यमातून मानसिक व भावनिक व्यवस्थापनाच्या कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. रोगप्रतिबंध व उपचार अंतर्गत सद्य परिस्थितीतील प्लाझ्मा थेरपी चे महत्व लक्षात घेऊन रक्तदान शिबिर आयोजित केले गेले. तसेच एन्फ्लूएन्झा आजार विरोधात रोगप्रतिकारक क्षमता वाढविण्यासाठी पनवेलकरांकरिता एन्फ्लूंझा लसीकरणाचा स्तुत्य उपक्रम देखील राबविला गेला. तरुणांमध्ये अँटी टोबॅको जनजागृती करिता ऑनलाईन झूम मीटिंग माध्यमातून कार्यशाळा आयोजित करण्यात आली, तसेच केईएम रुग्णालयातील कोविड योद्ध्यांकरिता ६६० मास्क्स व १००० प्रोटीन बार्स चे वाटप देखील केले. १५ ऑगस्ट च्या निमित्ताने वॉर हिरो या संकल्पनेवर आधारित भारताचा स्वातंत्र्यदिन अतिशय अभिनव पद्धतीने साजरा केला. या कार्यक्रमात कॅप्टन जोशी तसेच कमांडर जांभेकर यांनी त्यांचे युद्धाचे अनुभव व्यक्त केले. या कार्यक्रमात निवृत्त सैनिकांचा सत्कार करण्यात आला, तसेच व्यावसायिक उत्कृष्टते करिता दोघांना वोकेशनल अवॉर्ड देण्यात आले. आणि कोविड-१९ लॉकडाउनच्या दिवसांमध्ये उत्तम समाज सेवा केल्याबद्दल तिघांना सोशल सर्विस अवॉर्ड देखील देण्यात आले.

पीएसए बंदरावर महेंद्र घरत यांच्या नेतृत्वाचा झेंडा

दै.रायगड नगरी । उरण

पोर्ट ऑफ सिंगापूर ॲथॉरीटी पीएसए, बीएमसीटी बंदरातील क्युशी व आर.टी. जी ऑपरेटर परमनंट कामगारांनी बंदरातील अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराला कंटाळून आपले न्याय हक्क प्रस्थापित करण्याकरिता कामगार क्षेत्रातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर नेतृत्व करणारे झुंजार कामगार नेते महेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखालील न्यु मॅरीटाईम ॲन्ड जनरल कामगार संघटनेचे सभासदत्व स्विकारले आहे. गेली ३३ वर्षे कामगार क्षेत्रात अखंडपणे आपल्या लढाऊ नेतृत्वाखाली हजारो कामगारांना न्याय मिळवून देणारे, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर ILO-ITF या बलाढय संघाचे प्रतिनिधीत्व करत असलेले महेंद्र घरत यांनी सातत्याने असंघटित, अन्यायग्रस्त कामगारांच्या प्रश्नांवर वेळोवेळी लढे व आंदोलने, मोर्चे, संप पुकारून कामगारांचे न्याय हक्क प्रस्थापित केलेले आहेत. म्हणूनच कामगार क्षेत्रात असंख्य युवकांनी न्यु मॅरीटाईम ॲन्ड जनरल कामगार संघटनेच्या या चळवळीत महेंद्र घरतांच्या साथीने स्वत : ला झोकुन दिलेले आहे.

आज बुधवार दि. १६ सप्टे. २०२० रोजी पीएसए बंदराच्या मुख्य प्रदेश व्दारावर न्यु मॅरीटाईम ॲन्ड जनरल कामगार संघटनेच्या नामफलकाचे अनावरण कामगार नेते महेंद्रजी घरत यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी महेंद्र घरत यांनी पीएसए बंदरातील कामगारांना संबोधताना सांगितले कि, ३ वर्षीपुर्वी पीएसए बंदरातील ट्रेलर चालकांवर व्यवस्थापनाने अन्याय केला, त्यांना संघटित करून मुजोर व्यवस्थपनाच्या दादागीरीला भीक न घालता, कामगारांच्या पगारवाढीचा यशस्वी करार जी. टी. आय या बंदरातील ड्रायव्हर पेक्षा जास्त पगार व भत्ता मिळवून दिला आता बंदरातील कायमस्वरूपी कामगारांना ITF च्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्थरावरील वेतनाप्रमाणे वेतन मिळवून दिल्या शिवाय स्वस्थ बसणार नाही असे ते म्हणाले. या नामफलक अनावरण प्रसंगी संघटनेचे कार्याध्यक्ष पि. के. रामण, सरचिटणीस वैभव पाटील, उपाध्यक्ष किरीट पाटील, विनोद म्हात्रे, संजय ठाकूर, संघटक रोहित घरत, आदीनाथ भोईर, प्रेमनाथ ठाकूर, अंगद ठाकूर, चंद्रकांत ठाकूर, प्रांजल भोईर, राजेंद्र भगत, विवेक म्हात्रे, आदीत्य घरत, हितेन घरत, अरूण म्हात्रे, अमोल ठाकूर, प्रसाद पाटील, आंनद ठाकूर व सिंगापूर पोर्टचे कामगार उपस्थीत होते.

सरपंच ॲड.जनार्दन पाटील यांचा वाढदिवस साजरा

दै.रायगड नगरी । अलिबाग

सहयोग व्यापारी नागरी सहकारी पतसंस्थेचे कायदेविषयक सल्लागार सामाजिक कार्यकर्ते कुरुळचे सरपंच ऍड जनार्दन पाटील यांचा वाढदिवस आज त्यांच्या घरी अत्यंत साधे पाणी करण्यात आला.

अनेक मान्यवर मित्र ग्रामस्थ जेष्ठ नागरिक राजकीय मित्र नेते मंडळी डॉक्टर वकिली क्षेत्रातील मान्यवर, मित्र मंडळी दिवसभर भेटून फोन वर फेसबुक व्हॉटअप वर शुभेच्छा देत होती. संध्याकाळी आम्ही गुरुपौर्णिमा ग्रुप कुरुळ तर्फे यांना भेटून

वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी राकेश पाटील, अशोक घाडगे, सामाजिक कार्यकर्ते प्रवीण पाथरे, तंटामुक्त माजीअध्यक्ष प्रमोद पाथरे, बारक्या पाटील, (ग्रामपंचायत सद्स्य परेश पाटील, महेंद्र पाटील, रुपेश म्हात्रे, आकाश घाडगे, सुनील घाडगे, पत्रकार राजेश बाष्टे उपस्थित होते.

समाजसेवक अरविंद गायकर यांची उपोषणाला सुरुवात

मानवाधिकार संघटनेचा पाठिंबा जाहीर

दै.रायगड नगरी । गणेश चोडणेकर

आगरदांडा : मुरुड शहरातील समुद्र किनारी ४४ टपरी धारक ३ जुन रोजी झालेल्या निसर्ग चक्रीवादळामध्ये मुरूड समुद्रकिनारी असलेल्या ४४ टपरी धारक व स्टोल धारकांचे आतोनात नुकसान होवुन सुद्धा आज तीन महिन्यापेक्षा पेक्षा जास्त दिवस झाले तरी शासना कडुन टपरी स्टॉल्स धारकांना नुकसान भरपाई न मिळाल्याने पद्मदुर्ग व्यावसायिक संघटनेचे अध्यक्ष– अरविंद गायकर यांनी शासनानला जागे करण्याकरिता मुरूड तहसिलदार कार्यालया समोर आज पासुन आमरण उपोषणला सुरूवात करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी रायगड,व मुरुड तहसील कार्यालयाजवळ संपर्क साधून सुद्धा टपरी धारकांना नुकसान भरपाई देण्यास टाळा टाळ केली जात होती.पालकमंत्री याना सुद्धा पत्रव्यव्हार करूनसुद्धा नुकसान भरपाई मिळत नसल्याने अखेर नियोजित इशाऱ्याप्रमाणे अरविंद गायकर यांचे उपोषणास सुरुवात करण्यात आली आहे.यावेळी असंख्य टपरी धारक त्यांच्या समवेत होती.यामध्ये महिलांचा मोठा सहभाग दिसून आला टपरी धारकांना नुकसान भरपाई मिळालीच पाहिजे !,नुकसान भरपाई घेतल्याशिवाय हलणार नाही अश्या घोषणा देत संपूर्ण परिसर दणाणून गेले होते.

पद्मदुर्ग व्यावसायिक संघटनेचे अध्यक्ष– अरविंद गायकर यांनी या वेळी सांगितले कि, राज्य शासनाने महसूल व वन विभागाकडून १० जून रोजी एक अध्यादेश काढला गेला होता.यामधील क्रमांक ७ मधील मुद्यामध्ये अगदी स्पष्ठ पणे नमूद करण्यात आले आहे कि, दुकानदार व टपरीधारक हे स्थानिक रहिवाशी असतील त्यांना झालेल्या नुकसानीच्या ७५ टक्के रक्कम अथवा १० हजार रुपये भरपाई रक्कम देण्यात यावी मग असे असताना आम्हाला कोणत्या आधारे मदत दिली जात नाही.शासनाचा अध्यादेश असताना सुद्धा सरकारी अधिकारी गरीब टपरी धारकांना मदत देत नसल्यानेच मी उपोषणाचा मार्ग पत्करला आहे. जोपर्यंत आम्हाला मदतीचे ठोस आश्वासन मिळत नाही तोपर्यंत आम्ही आमचे उपोषण सुरूच ठेवणार असल्याचे प्रतिपादन यावेळी केले.

या उपोषणास मानवाधिकार संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष जाहिद फकजी यांनी आपला पाठिंबा दिला आहे.याबाबतचे अधिकृत पत्र त्यांनी गायकर याना दिले आहे.

सदरील उपोषणाच्या वेळी सर्व टपरी धारक तहसील कार्यालयाच्या आवारात उपस्थित होते.यावेळी मुरुड पोलीस ठाण्याकडून चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

पोलिसांच्या वेलनेस टीमने डी.वाय. पाटील हॉस्पिटलला दिली अचानक भेट

दै.रायगड नगरी । पनवेल

गेल्या चार महिन्यापासून नवी मुंबई पोलीस दल आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी, वेलनेस टीम सातत्याने कार्यरत आहे. पोलीस आयुक्त बिपिन कुमार तसेच सहपोलीस आयुक्त जाधव यांनी दिलेल्या निर्देशानुसार डी वाय पाटील हॉस्पिटल येथे भेट दिली व तेथे उपचार घेणाऱ्या पोलीस बांधवांसह त्यांच्या कुटुंबियांची चौकशी केली. त्यांना दिलासा दिला.

प्रथम डी वाय पाटील हॉस्पिटल चे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल पेड्डावाढ यांच्याशी बेडच्या उपलब्धतेबाबत व आणखी बेड मिळण्याबाबत, तसेच आयसीयु मध्ये दाखल असलेले ४ रुग्ण आणि ऑक्सीजन वर असलेले १० रुग्ण यांच्या तब्येतीबाबत चर्चा करण्यात आली.

त्यानंतर पोलीस उपायुक्त सुरेश मेंगडे, पोलीस उपायुक्त शिवराज पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे विनोद चव्हाण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक कोल्हटकर व वरिष्ठ पोलीस निरीक्षक अर्जुन गरड यांनी डी वाय पाटील हॉस्पिटल येथील कॉर्डिनेटर स्टाफ यांना सोबत घेऊन, सर्वांनी पीपीई किट परिधान केले. तसेच डी वाय पाटील हॉस्पिटल येथील दाखल असलेल्या जवळ–जवळ सर्वच ५० – ५५ पेशंट यांच्याशी समक्ष भेट घेऊन तब्येती बाबत विचारपूस केली व आयुक्तांच्या वतीने, त्यांना धीर दिला आणि त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच जेवणा बाबतही चौकशी करून, स्वतः जेवण तपासून घेतले. एकंदरीत पोलिस आयुक्त यांच्या निर्देशानुसार वेलनेस टीमने अचानकपणे समक्ष भेट देऊन आस्थेवाईकपणे चौकशी केल्याबद्दल, पोलीस रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले.

वीज वितरणकडून येत असलेल्या वाढीव बिलामुळे नागरिक त्रस्त : आंदोलनाचा इशारा

दै.रायगड नगरी । वाकण

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून वीज ग्राहकांना गेल्या काही महिन्यांपासून अव्वाच्या–सवा विज बिले आकारण्यात येत आहेत. त्यामुळेच प्रत्येक महिन्यात येत असलेल्या वाढीव वीज बिलामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

कोरोना सारख्या महामारीमुळे गोरगरीब जनतेच्या तोंडचे पाणी पळाले असून गोर गरीब आदिवासी बांधव व सर्वसामान्य नागरिक यांना दोन वेळचे जेवण मिळणे देखील मुश्कीलीचे झाले आहे. कोरोना महामारीमुळे संपूर्ण जगावर संकट आल्यामुळे जो तो स्वतःचे जीव कोरोनापासून वाचविण्याचा प्रयत्न करीत आहे. कोरोना महामामारीमुळे कंपन्या बंद पडत चालल्या आहेत. कंपनीतील कामगार व ठेकेदार यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे. कंपनीतून नोकरी गेल्यामुळे कामगार यांच्यावर अवलंबून असलेले त्यांचे कुटुंब देखील देशोधडीला लागले आहे. त्यातच भरमसाठ येत असलेल्या वीज बिलामुळे सर्वसामान्य जनतेचे कंबरडेच मोडले आहे. गोरगरीब जनतेला पोटाची खळगी भरताना मुश्कील झाले असताना त्यांनी काट कसर करुन आलेले जुलै महिन्याचे वीज बिल ऑनलाईन भरुनही विद्युत मंडळाकडून जनतेला वेठीस धरण्याचा प्रयत्न होत असल्याचे दिसून येत आहे. पेण–सुधागड –रोहे तालुक्यातील जनतेची होणारी परवड विद्युत मंडळाच्या अधिकाऱ्यांनी थांबवावी. तसेच वाढीव बिल दुरुस्त न केल्यास वीज मंडळा विरोधात सर्व जनतेस बरोबर घेऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा भाजपचे माजी जिल्हा उपाध्यक्ष किशोर म्हात्रे यांनी दिला आहे.

याबाबत अधिक माहिती घेण्यासाठी नागोठणे विद्युत वितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता वैभव गायकवाड यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की, ऑगस्ट महिन्याची बिले ही रिडींग नुसार आलेली आहेत. या रिडींग मध्ये माहे मार्च ते ऑगस्ट पर्यंतचा वीज वापर आहे. लॉकडाऊनच्या कालावधीत मिटर रिडींग घेणे बंद करण्यात आले होते. त्यामुळे ग्राहकांना सरासरी बिल देण्यात आली होती. तसेच निसर्ग चक्रीवादळाच्या काळात ग्राहकांना शुन्य (०) युनिटचे बिल दिले होते. त्यामुळे आता आलेल्या बिलामध्ये ग्राहकांनी भरलेली बिले, आणि स्लॅब बेनिफिट देण्यात आला आहे. व वीजवापर करून राहिलेल्या शिल्लक युनिटचे बिल देण्यात आले आहे. तसेच एकदम बिल भरण्यात येत नसल्याने त्यामध्ये तीन हफ्ते करून देण्यात येत आहेत. तरी काही शंका असल्यास वीज कार्यालयास संपर्क साधावा असे आव–हनही वैभव गायकवाड यांनी केले आहे.

सततच्या 'बत्तीगुल' मुळे श्रीवर्धनकर हैराण

खिशात दमडी हि नसल्याने आजही वीजबिल माफीची आस

दै.रायगड नगरी । दांडगुरी

श्रीवर्धन तालुक्यातील सतत होणाऱ्या खंडित वीजपुरवठ्या मुळे येथील ग्राहक हैराण झाला आहे. आधीच कोरोना महामारीमुळे झालेली टाळेबंदी आणि निसर्ग चक्रीवादळाच्या जोरदार तडाख्याने उध्वस्त झालेले घर संसार त्यात सतत च्या बत्ती गुल मुळे येथील ग्रहण पुरता हैराण झाला आहे. दररोज चार ते पाच तास वीजपुरवठा खंडित होतो.

श्रीवर्धन मधील चक्रीवादळामुळे दिड महिने विज पुरवठा नव्हता. वादळानंतर विजपुरवठा पुर्ववत करण्यासाठी महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी अहोरात्र काम करुन तो पुर्ववत केला. परंतु गेले काही दिवस आजही काहींनाहीया तांत्रिक अडचणी मुळे तासन तास विज पुरवठा खंडीत होत आहे त्यामुळे विजेच्या या लहरीपणामुळे ग्रामिण व शहरी भागातील जनता त्रस्त आहे. यामुळे टाळेबंदीच्या तिन महीन्यानंतर सुरु झालेले छोटे छोटे उद्योग चालविणे देखील कठीण होत आहे. त्यातच टाळेबंदीमुळे तीन महीने न आलेली विजबिले आता ऑगस्ट महीन्यात एकत्रीत आल्याने ती आता कशी भरायची या चिंतेत वीज ग्राहक आहे. वारंवार विज पुरवठा खंडीत होऊनसुध्दा मोठ्या रकमेची विज बिले कशी येतात असा संतप्त सवालसुध्दा जनता उपस्थित करीत आहे. त्यामुळे कोरोना व निसर्ग चक्रीवादळाने कंबरडे मोडलेल्या जनतेला महावितण व ऊर्जा मंत्र्यांनी दिलासा द्यावा.अशी मागणी होत आहे

विधान परीषद आमदार अनिकेत तटकरे यांनी उर्जामंत्र्यांना लेखी निवेदनद्वारे वीजबिल माफ करण्याची विनंती केली मात्र अद्यापही त्यावर कारवाई झालेली नाही. किंबहुना वीजबिल भरण्याची मुदतही संपून गेल्याने आता विजबिल माफ होण्याची आशा देखील धूसर झाली आहे. त्यामुळे हे निवेदन म्हणजे दिखावा होता असा संतप्त सवाल आता सामान्य नागरिक करत आहेत.

> वादळात मुख्य फिडर बंद पडल्याने गोंडघर येथील सब स्टेशनचे इनकमर कार्यान्वयीत करुन विजपुरवठा सुरु करण्यात आला.परंतू तोंडसुरे ते गोंडघर या गावामधील काही दुरुस्तीचे काम निघाल्यास ते बंद करावे लागते. त्यामुळे त्याचा परिणाम इतर विभागावर होतो तोंडसुर ते गोंडघर येथे मुख्य फिडरच्या भूमिगत विज वाहीनीचे काम चालू असून त्याच्या क्रॉसिंग व इतर दुरुस्तीसाठी विज पुरवठा बंद करावा लागतो मुख्य फिडरचे काम चालू असून नविन फीडर कार्यान्वयीत झाल्यावर विजपुरवठा पुर्ववत होइल त्यासाठी किमान दोन महिन्याचा कालावधी जाईल.
>
> **- महेंद्र वाकपैंजन, उपअभियंता, महावितरण श्रीवर्धन**

कोंडले–मोरबे धरणात आढळला महिलेचा मृतदेह

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल तालुक्यातील कोंडले–मोरबे धरणात आज सकाळी स्थानिक ग्रामस्थांना एका महिलेचा मृतदेह बांधलेल्या व फुगलेल्या अवस्थेत आढळून आला असून लांब केसावरुन सदर मृतदेह हा महिलेचा असल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

येथील धारणातील पाण्यात रश्शीने गच्च बांधलेल्या व फुगलेल्या अवस्थेत एक मृतदेह तरंगत होता. त्या परिसरात वावरणाऱ्या ग्रामस्थांना ही बाब लक्षात येताच त्यांनी तातडीने पनवेल तालुका पोलिसांशी संपर्क साधून याबाबतची माहिती दिली.

त्यानुसार पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि अशोक राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक घटनास्थळी रवाना झाले. त्याचप्रमाणे पोलीस उपायुक्त, सहा.पोलीस आयुक्त व इतर गुन्हे प्रकटीकरण विभाग आदींचे पथक व अधिकारी घटनास्थळी जावून त्यांनी याबाबत अधिक माहिती घेण्यास सुरूवात केली आहे. सदर महिलेला कोणत्या कारणासाठी मारण्यात आले असावे याचा शोध पनवेल तालुका पोलीस करीत आहेत.

माथेरानच्या दलित वस्तीसाठी निधी मिळावा : शिवाजी शिंदे

दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे

माथेरान : माथेरान मधील बहुतांश ठिकाणी अनेक विकास कामे मार्गी लागत असतांना प्रशासनाने आजवर येथील दलित वस्तीकडे सहसा गांभीर्याने लक्ष केंद्रित न केल्यामुळे या भागातील नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी मूलभूत सेवासुविधा उपलब्ध व्हाव्यात जेणेकरून तेथील रहिवाशांना सुद्धा कुठल्याही प्रकारची अडचण आणि समस्या उद्भवणार नाही यासाठी नगरपरिषदेतील काँग्रेसचे विरोधी पक्षनेते शिवाजी शिंदे यांनी शासनाकडून दलित वस्तीच्या विकासाकरिता मागील काळात आलेला निधी खर्च न केल्यामुळे परत गेला होता तोच निधी पुन्हा दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत उपलब्ध व्हावा यासाठी रायगडच्या जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले आहे.

माथेरान मध्ये दलित वस्ती आजही उपेक्षित असून ज्याप्रमानात या भागाचा विकास व्हायला अपेक्षित आहे तो आजवर झालेला नाही. शासनाकडून या वस्तीच्या मूलभूत सोयी सुविधा करिता सन २०१९–२० या सालामध्ये निधी प्राप्त झाला होता त्यापैकी काही रक्कम खर्च करून मार्च २०२० पर्यंत रक्कम रुपये नगरपरिषदेत ४३,२९,५४५ शिल्लक होती. परंतु दि.२२ मार्च २०२० रोजी पासून कोरोना या भयंकर आजाराच्या महामारी मुळे संपूर्ण देशात लॉक डाऊन जाहीर करण्यात आले होते. त्यामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेवरील विपरीत परिणाम लक्षात घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयाने दलित वस्ती विकासाकरिता आरक्षित व नगरपरिषदेकडे शिल्लक असलेला निधी परत काही काळ मर्यादेकरिता मागविण्यात आला आहे. सदरच्या निधी अभावी दलित वस्तीतील अनेक विकास कामे, नागरिकांना भेडसावत असलेल्या अडचणी सोयीसुविधा या पुर्णतः खुंटलेल्या आहेत. यामध्ये अतिवृष्टीमुळे अंतर्गत रस्त्याची वाताहत झालेली असून सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी गटारे सुध्दा अस्ताव्यस्त झालेली असल्याने या वस्तीच्या आजवर प्रलंबित मूलभूत सुविधांच्या विकास कामांसाठी सदरचा निधी परत मिळावा असेही विरोधी पक्षनेते शिवाजी शिंदे यांनी निवेदनात नमूद केले आहे. लवकरच हा निधी प्राप्त झाल्यावर खऱ्या अर्थाने या भागाचा आणि नागरिकांचा सर्वांगीण विकास होण्याची चिन्हे या निवेदनाच्या निमित्ताने स्पष्ट होत आहेत.

दगडाने महिलेची हत्या करणारा आरोपी गजाआड

दै.रायगड नगरी । पनवेल

दारु पिण्याच्या वादातून महिलेची दगडाने हत्या करणाऱ्या आरोपीस पनवेल शहर पोलिसांनी गजाआड केले आहे.

शहरातील नवीन पनवेल बाजूकडे जाणाऱ्या उड्डाण पुलाखाली बेकायदेशीररित्या वास्तव्य करणाऱ्या एसपेथ उर्फ लक्ष्मी पप्पू स्वामी मैलर (४०) ही एका इसमाबरोबर राहत होती. त्या दोघांना दारु पिण्याचे व्यसन होते. त्यातून त्यांच्यात वादविवाद होत होते.

अशाच प्रकारे दारु पिण्यासाठी पैसे दे अशी मागणी आरोपी अमोल तायडे यानी सदर महिलेकडे केली त्यातून वाद होवून त्या रागाच्या भरात अमोल याने आजूबाजूच्या दगडाने तिला मारहाण करून गंभीररित्या जखमी करून निघून गेला. यात सदर महिला मयत झाली असून या घटनेची माहिती मिळताच पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि अजयकुमार लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक तायडे व त्यांच्या पथकाने आरोपीला ताब्यात घेतले आहे.

केंद्र शासनाच्या पीएम-स्वनिधी योजनेंतर्गत गरजू पथविक्रेत्यांना कर्ज वाटप

अधिकाधिक पथविक्रेत्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे आवाहन

दै.रायगड नगरी । अलिबाग

कोविड–१९ महामारी व त्यानंतरच्या लॉकडाऊनमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे देशातील अनेक लोकांचे लहान–मोठे उद्योग बंद पडले. त्यात रस्त्यांवर दुकान लावून (पथविक्रेते) त्यावर उपजीविका करणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. अशा लोकांकरिता केंद्र शासनाने पीएम–स्वनिधी योजना सुरु केली आहे. जेणेकरून पथविक्रेत्यांना त्यांचा व्यवसाय पुन्हा सुरू करून आपले स्वतःचे घर चालविता येईल.

जिल्हाधिकारी श्रीमती निधी चौधरी यांनी या योजनेचा लाभ जास्तीत जास्त लोकांनी करून घ्यावा, असे आवाहन पथविक्रेत्यांना केले आहे. तसेच जिल्हा अग्रणी प्रबंधक श्री.आनंद लिंबेकर यांनी नगरपालिका क्षेत्रातील इच्छुक गरजूंनी आपले कर्ज प्रस्ताव बँकेकडे त्वरित पाठवण्याची विनंती केली असून ही योजना तळागाळापर्यंत पोहोचण्यासाठी बँकांनी सहकार्य करावे, असे आवाहनही केले आहे. आतापर्यंत रायगड जिल्ह्यात बँकेमार्फत ३५ लोकांना कर्ज वाटप करण्यात आले आहे. त्यात बँक ऑफ इंडियाचा सर्वात मोठा वाटा आहे. तसेच दि. १५ सप्टेंबर रोजी कर्ज वितरणाचा कार्यक्रम अलिबाग येथील आयडीबीआय बँकेत करण्यात आला. यात जिल्हा अग्रणी प्रबंधक आनंद निंबेकर आणि आयडीबीआय बँकेचे शाखा प्रबंधक सागर वैद्य यांनी पथविक्रेत्यास पाणीपुरी व्यवसायासाठी कर्ज मंजूरीचे पत्र देऊन कर्ज वाटप केले. या योजनेत ज्यांना नगरपरिषदेने परवाना दिले आहेत, अशा पथविक्रेत्यांना बँकेकडून रुपये दहा हजार पर्यंतचे कर्ज मिळू शकेल. कर्जाची परतफेड बारा महिन्यात समान हप्त्याने करावयाची आहे. जे नियमित परतफेड करतील त्यांना ६ टक्के व्याजाची परतफेड सरकारद्वारे करण्यात येईल.

सुधागड तालुक्यात कोरोनाने पुन्हा डोके वर काढले, एकाच दिवशी आढळले १२ कोरोना बाधीत रुग्ण

दै.रायगड नगरी । पाली/बेणसे

सुधागड तालुक्यात मागील चार दिवसांपासून कोरोना रुग्णांमध्ये कमालीची घट झाली होती. मात्र मंगळवारी कोरोनाने पुन्हा डोके वर काढले. सुधागड तालुक्यात मंगळवारी (दि.१५) रोजी उशिरा प्राप्त झालेल्या अहवालानुसार १२ कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण सापडले आहेत. तर ८ जण बरे होऊन घरी परतले आहेत. जिल्ह्यातील अनेक तालुक्यात कोरोनाचा संसर्ग वेगाने फैलावताना दिसतोय. जिल्हा प्रशासनाबरोबरच तालुका प्रशासन व आरोग्य यंत्रणेपुढे कोरोनाला रोखण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

सुधागड तालुक्यात आता कोरोनाचे ३४० रुग्ण झाले असून आत्तापर्यंत स्वतःची इच्छाशक्ती , आत्मविश्वास व आरोग्य यंत्रणेच्या यशस्वी प्रयत्नाने कोरोनाचे २६० रुग्ण बरे झाले आहेत. तर १६ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. आणि ६४ रुग्णांवर उपचार सुरू आहेत. अशी माहिती सुधागड–पाली तहसीलदार दिलीप रायन्नावार यांनी दिली आहे. कोरोनाला रोखण्यासाठी विविध उपाययोजना राबविल्या जात आहेत. आवश्यक साधनसामग्री व यंत्रणा देखील वापरात आणली जात आहे.एकूणच प्रशासन योग्य प्रकारे काम करत आहे. घरात कुणी आजारी असल्यास त्वरित उपचार घ्यावेत. नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे आणि शासन नियमांचे पालन करून खबरदारी घ्यावी असे आवाहन तहसीलदार दिलीप रायन्नावार यांनी केले आहे.